खासदारांना असलेल्या सर्व सवलती परिषदेच्या अध्यक्ष आणि सर्व पदाधिकाऱ्यांना मिळाल्याच पाहिजेत. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद असे ज्या संस्थेचे नांव, तिथे सेवकवर्ग किती तर मुख्य कार्यालयात फक्त सात जण. निर्णय घेण्याचे अधिकार ज्यांना देतां येतील असे सुशिक्षीत, पदवीधर, व्यवस्थापनाचा अभ्यास असलेले कार्यकर्ते कार्यालयात असावेत.

१०) राज्यशासनाच्या स्पर्धांना परिक्षक नेमताना, शिक्षण, अनुभव, रंगमंचावरचा वावर, स्वच्छ वाणी अशा अनेक गोष्टी विचारात घ्यायला हव्यात. प्रवास, निवास व भोजन या सुविधा उत्तम असल्याच पाहिजेत व उत्तम मानधन तेंही स्पर्धा संपल्यानंतर ८ दिवसांत मिळायला हवे. परीक्षकांचे दोन दिवसांचे शिबीर, ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखालीं घ्यावें.

११) रंगकर्मींच्या निवृत्ती वेतनाबद्दल विचार व्हायला हवा. सध्या जास्तीत जास्त म्हणजे कमाल पेन्शन रु. २१००/- आहे. एवढ्या प्रचंड रकमेची गरज आहे का ? शक्य झाल्यास निवृत्ती वेतन कमी करून कलावंतांना अधिक श्रम करण्यास उद्युक्त करावे. यातील उपरोध कधीतरी लक्षात येईल का ?

आणखीही पुष्कळ लिहावें, बोलावें असे वाटतें नसलेल्या अधिकाराच्या कक्षेत राहून कार्य करायचें तर मर्यादा येणारच मुळातच हे सम्मेलन ३/४ महिने पुढें गेल्यामुळें माझा कार्यकाळ ७/८ महिनेच आहे. म्हणजे मनांतील सर्व गोष्टी पुऱ्या होण्यासाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. अर्थात् पुढील सम्मेलनापर्यंत कुणीही कशाचीच दखल घेणार नाही आणि "सुखं शेते" म्हणत डोक्यावर पांघरूण ओढत निद्राधीन होतील.